शपथपत्र (100 रु. स्टॅम्प पेपरवर)

(ई टेंडरींग निविदा धारकाकडून हर्रासाची 1/4 रक्कम भरुन घेतल्यानंतर भरावयाचे)

मी,----------(पूर्ण नांव) रा.-_____
ता.----------जि.---------- रेती घाट हर्रास घेणार शपथेवर लिहुन देतो की, मी मौजा----------ता.----------जि. अकोला येथील सर्व्हे नं./ग.क्र.----------
क्षेत्र----------हे.आ./चौ.मी. या रेतीघाटाचा सन 2016-17 या वर्षाकरीता (30.09.2017 पर्यंत) रु.----------(अक्षरी रु.----------) किंमतीस हर्रास घेतलेला आहे. सदर रेती घाट जिल्हाधिकारी अकोला यांनी मंजुर केल्यास करारनाम्याच्या तारखेपासून दि. 30.09.2017 पर्यंत किंवा पर्यावरण विभागाची परवानगी ज्या तारखेपर्यंत मिळेल यापैकी जी तारीख अगोदरची असेल त्या तारखेपर्यंत मंजूर रेती साठयाचे उत्खनन व वाहतूक करण्यात येईल.

उक्त रेतीघाटाची ई-निविदा भरण्यापूर्वी सदर रेती घाटाची मी, मोक्यावर जाऊन पाहणी केली असून रेती घाटाची स्थिती, रेती साठा व्यवस्थित दिसून आल्यावरच मी माझ्या मर्जी नुसार हर्रास घेतला आहें. भविष्यात नैसर्गिकरित्या अथवा अन्य कारणामूळे आणि डॅमचे तसेच तलावाचे पाण्यामुळे घाटाचे स्थितीत बिघाड होऊन किंवा शासकिय रस्ता उपलब्ध नसल्यामूळे/इतर कारणा मुळे रेती उत्खनन/वाहतूक करावयास अडचणी आल्यास शासना विरुध्द माझी कोणतीही तक्रार राहणार नाही व अशी स्थिती निर्माण झाल्यास रेतीघाटाच्या हर्रासाची रक्कम मी परत मागणार नाही. रेतीघाट हर्रासाबाबतच्या अटी व शर्ती मी स्वतः वाचल्या/ वाचून घेतल्या असून त्यासाठी मी याद्वारे बंधनकारक आहे.

सदर रेतीघाटाचे ई-टेंडर/ हर्रासाच्या रक्कमेच्या 1/4 रक्कम रु.---------- (अक्षंरी रु.----------) ईटीजीएस/चलान क्र. ----------दि.---------- नुसार शासकिय खजिण्यात/डि.डि.भरणा केली आहे. सदर रेतीघाटास जिल्हाधिकारी अकोला यांनी मंजूरी प्रदान केल्यानंतर जिल्हाधिकारी अकोला यांचे सर्वात जास्त ई-टेंडरींगच्या रकमेनूसार मंजूर, आदेशानूसार माझ्या द्वारे 3/4 रकमेचा भरणा व करारनामा करतेवेळी ई-निविदा अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रु. 300000/- (रुपये तीन लक्ष फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या 20 % यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम किंवा ज्या वाळू गटाची हातची किंमत रु. 10 लाखापेक्षा कमी असेल तर हातची किंमतीच्या 20% रक्कम अनामत म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे ती रक्कम 15 दिवसांच्या आत शासन जमा करेल. विहित कालावधीत असे न केल्यास मी भरलेली हर्रासाची रक्कम शासन जमा होऊन व सदर घाट माझ्या नावाने रद्द होऊन पुन्हा हर्रास केल्यास यात माझी काहीही हरकत राहणार नाही. सदर घाट हा पुन्हा हर्रास झाल्यास त्या घाटाचे हर्रासाचे फरकाची रक्कम किंवा हर्रास न झाल्यास यापुर्वी घेण्यात आलेल्या हर्रासाची 3/4 रक्कमेचा भरणा करण्यास सहमत आहे आणि असे जर न केल्यास जमिन महसूलाची थकबाकी म्हणून सदर रक्कम माझेकडून भरणा करण्यात येईल व माझे सदर रेती घाटावर कोणताही मालकी हक्क राहणार नाही याची मला जाणीव आहे. सदर नूकसान भरपाई बाबत शासनाकडे कोणतीच फिर्याद करणार नाही, किंवा न्यायालयात धाव घेणार नाही.

रेती उत्खनन व वाहतूकी बाबतच्या सर्व अटी/शर्थींचे मी पूर्णतः पालन करीन, याचे उल्लंघन केल्यास मी दंडनिय कार्यवाहीस पात्र राहील.

1) जमातदाराचे पूर्ण नांव व पत्ता सही----------
---

2) जमातदाराचे पूर्ण नांव व पत्ता सही----------

हर्रासधारकाचे पूर्ण नांव ----------

सही ----------